करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
वर्ष 34 वे
www.saptahiksandesh.com
संस्थापक संपादक डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०


Shweta Gift & Toys
श्वेता गिफ्ट ॲन्ड टाईज
लहान मुला-मुलींसाठी थार(जीप) 4 X 4 येथे उपलब्ध !
श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा. (9822058106 )

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.२७ | पाने-१६ | दि.२५/०४/२०२५ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.

॥ श्री ज्योतिबा प्रसन्न ॥
फ्रेंड्स मोबाईल शॉपी & इलेक्ट्रॉनिक्स
आमच्याकडे सर्व नामांकित कंपन्यांचे नवीन **मोबाईल** व **स्मार्ट एलईडी टिव्ही** होलसेल दरात मिळतील.
मोबाईल खरेदीवर हमखास भेटवस्तू
सर्व प्रकारचे फायनान्स उपलब्ध
डाऊन पेमेंटवर मोबाईल मिळेल.
एक्सचेंज : जुना द्या, नवीन घ्या..!
प्रोप्रा : प्रफुल प्रदीप शिंदे
पत्ता : किल्लावेस, करमाळा.(9823162510, 9326969696)

रूचकर, स्वादीष्ट, चविष्ट जेवणासाठी
न्यु यशराज फॅमिली रेस्टॉरंट
व्हेज/नॉनव्हेज
गोवा मधील बीच चा आनंद & गोवा नाईट पबचा आनंद
• भव्य पार्कींगची सोय
• विनम्र व तत्पर सेवा
• फॅमिलीसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था
कार्यालयाचा भला मोठा खर्च वाचवा, छान.. छान..
न्यु यशराज फॅमिली रेस्टॉरंटला एकवेळ याल तर पुन्हा सारखे सारखे याल..
बर्थडे व ॲनेव्हर्सी पार्टी तसेच छोटे-मोठे कार्यक्रमाची ऑर्डर स्विकारली जाईल.
करमाळा-कर्जत रोड, धर्मसंगीत मंगल कार्यालय शेजारी, करमाळा.(9326969696, 9881494650)

## आदिनाथवर आ.पाटील गटाची एकहाती सत्ता - चेअरमन पदाची निवडणूक २८ एप्रिलला होणार

# चेअरमन पदी आमदार पाटीलच - व्हा.चेअरमन पदासाठी चुरस

करमाळा : श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत आमदार नारायण (आबा) पाटील व अन्य सहकारी गटाचा संपूर्ण पॅनल विजयी झाला आहे. सोमवारी (ता.२८) सकाळी अकरा वाजता चेअरमन, व्हा.चेअरमन पदाची निवडणूक होत असून चेअरमन पदी आमदार नारायण आबा पाटील यांची निवड होणार असल्याची खात्रीलायक माहिती समजली आहे. तर व्हा.चेअरमन पदासाठी संचालक नवनाथ झोळ, डॉ.हरिदास केवारे, श्रीमान चौधरी, देवानंद बागल यांच्यात जोरदार चुरस आहे.

आदिनाथ साखर कारखान्याच्या निवडणुकीत विद्यमान आमदार नारायण पाटील, मोहिते-पाटील गट विरूध्द माजी आमदार संजयमामा शिंदे तसेच प्रा.रामदास झोळ अशी तिरंगी लढत झाली होती. या लढतीत माजी आमदार जयवंतराव जगताप व माजी आमदार शामलताई बागल या गटांनी पाटील गटास पाठींबा दिला होता. दरम्यान माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी स्वत:च्या गटावर जोरदार झुंज दिली होती. प्रा.झोळ



पॅनल मात्र एक हजाराच्या आतच रेंगाळला. या निवडणुकीत यश मिळाले ते विद्यमान आमदार नारायण आबा पाटील यांचेकडे पाहूनच मिळाले आहे. त्यांनी निवडणुकीत आमदारकी पणाला लावून कारखाना यशस्वीरित्या चालवू असे आश्वासन दिले आहे. त्या पार्श्वभुमीवर आमदार पाटील यांनाच चेअरमन केले जाणार आहे व त्यांच्या नेतृत्वाखाली कारखाना सुरळीत सुरू करण्याचे धोरण पाटील समर्थकांचे आहे. त्यानुसार चेअरमन पदी नारायण पाटील हे निश्चित असून व्हा.चेअरमन पदासाठी मात्र जोरदार चुरस आहे. असे असलेतरी व्हा.चेअरमन निवडीचे सर्व अधिकार आमदार पाटील यांना देण्यात आले आहेत. या निवडणुकीत विजयी झालेल्या उमेदवारांची आकडेवारी पुढीलप्रमाणे...

**महिला राखीव** : राधिका तळेकर - ८५३७ (विजयी), उर्मिला सरडे - ८३८३ (विजयी), मंदा सरडे - ६८७४, शालन गुंडगिरे - ७०७३, इंदुबाई नाईकनवरे - ७९४, रत्नमाला मंगवडे - ७६२. **संस्था प्रतिनिधी** : डॉ.हरिदास केवारे -२१८ (विजयी) पान २ वर


1 मे
कामगार नेते
आण्णा
क्षणोक्षणी आमच्या मनी
तुमची आहे आठवण
हीच आमच्या जीवनातील
अनमोल आहे साठवण
पुर्नजन्म घ्यावा तुम्ही
हीच आमची..
कमलाभवानी चरणी प्रार्थना !
श्री आदिनाथ कारखान्याचे माजी संचालक, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य
हमाल-पंचायतचे माजी अध्यक्ष, गोरगरीबांचे कैवारी व कामगार नेते
कै.सुभाष(आण्णा) सावंत
७४ व्या जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन
अभिवादक
शैलेश मधुकर खडके (B.E.Civil)
'गव्हर्मेंट इंजिनिअर अँन्ड कॉन्ट्रॅक्टर' शिवाजीनगर, करमाळा.

राजकारण म्हणजे सत्ता मिळवणे एवढेच नसते तर समाजाला अजमावून पाहणे हे सुध्दा महत्वाचे असते !

## संपादकीय.........................................!

# 'आदिनाथची सत्ता' सत्व पाहणारी !

'आदिनाथ' ची निवडणूक म्हणजे विधानसभा २०२४ ची पुनार्रावृत्ती म्हणावी लागेल. विधानसभा निवडणुकीच्या आगोदर झालेल्या बाजार समितीच्या निवडणुकीत तत्कालीन आमदार संजयमामा शिंदे यांचा जगताप गटाला पाठींबा होताच, पण विद्यमान आमदार नारायण आबा पाटील व माजी आमदार जयवंतराव जगताप यांना मोहिते-पाटील यांच्या सुचनेनुसार पाठबळ दिले अर्थातच यावेळी बागल गटानेही मोहिते-पाटील यांची सुचना मान्य करून पाठींबा दिला व बाजार समिती निवडणूक बिनविरोध झाली. अर्थातच त्यामुळे जगताप गट पुन्हा बाजार समितीवर सन्मानाने आरूढ झाला. अर्थातच त्यावेळी झालेल्या युतीमध्ये विधानसभा निवडणुकीला जगताप गटाने नारायण आबांना साथ देण्याबाबत चर्चा होती. दरम्यान लोकसभेला महायुतीचे पानीपत झाल्यामुळे विधानसभेला सुध्दा महाविकास आघाडीला यश मिळणार हे गृहीत धरून माजी आमदार जगताप यांनी संजयमामा शिंदे यांना बाय बाय करून महाविकास आघाडीला अर्थातच नारायण आबांना पाठबळ दिले . त्याचा फायदा झाला व पाटील मोठ्या मत्ताधिक्याने आमदार म्हणून निवडून आले.

त्यानंतर आदिनाथची निवडणूक जाहीर झाली. ही निवडणूक बिनविरोध व्हावी अशी सर्वसामान्य सभासदांची इच्छा होती पण तसे झाले नाही. चौरंगी लढतीची अपेक्षा होती. परंतू ऐनवेळी दोन गटांनी निवडणूकीतून मायार घेतली. त्यामुळे दुरंगी लढत नक्की असताना प्रा.रामदास झोळ यांनी आपला पॅनल उभा केला. माजी आमदार संजयमामा शिंदे विरूध्द विद्यमान आमदार नारायण पाटील अशी लढत ठरली. सोबतच झोळ सरांचा पॅनलही राहिला, त्यामुळे या लढतीला तिरंगी लढतीचे स्वरूप आले पण निवडणूक निकालानंतर ही लढत दुरंगी झाले हे स्पष्ट झाले.

आदिनाथची निवडणूक व विधानसभा निवडणूक यात जमीन अस्मानाचे अंतर आहे. विधानसभेला सर्वसामान्य मतदार असतात, आदिनाथला फक्त सभासदांनाच मतदानाचा अधिकार आहे. पाटील गटाने या निवडणुकीत बातम्या,पत्रकबाजी, जाहीराती, रोड शो यापेक्षा घर ते घर जावून मतदारांना आपली भुमीका समजवण्याचे काम केले, तो प्रयोग त्यांच्या उपयोगी पडला. महत्वाच्या गावात सभा घेऊन विरोधकांच्या आरोपांना सडेतोड उत्तर दिले. सर्वात महत्वाचे म्हणजे त्यांनी जगताप गट व बागल गट यांचा पुर्ण विश्वास संपादन करून सर्व शक्तीनिशी पाठींबा मिळवला. त्यामुळे त्यांचा विजय सहज सोपा झाला. तरीही माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या पॅनलला झालेले मतदान हे पाटील गट, मोहिते-पाटील गट, जगताप गट व बागल गट यांना विचार करायला लावणारे आहे. शिंदे गटाचा सरासरी दीड ते अडीच हजाराच्या मतांनी पराभव झाला. म्हणजे चार गट एकत्र असूनही त्यांना जे मतदान मिळायला पाहिजे ते झाले नाही; हे स्पष्ट आहे. असो.. यश ते यशच असते. 'जो जिता वही सिंकदर' याप्रमाणे पाटील गट जिंकला विषय संपला.

आता खरी लढाई बागल गटाचीच आहे. कारखान्यावर झालेले बँकेचे व शासकीय कर्ज, इतरांची म्हणजे कामागारांचे पगार ते व्यापाऱ्यांची देणी आणि कारखाना दुरूस्तीपासून ऊस तोड मुकादम, वाहानधारक, मुकादम या सर्व बाबी पाहून नव्याने येणारा हंगाम यशस्वी करण्याचे मोठे आव्हान आहे. पावणे दोनशे कोटी रूपयाचे कर्ज व उत्पन्नाची साधनं कमी याबाबी महत्वाच्या आहेत. नारायण आबा पाटील हे विद्यमान आमदार आहेत. पण ते विरोधी गटाचे आमदार आहेत. त्यामुळे त्यांच्या समोर पैसा उभा करण्याचे मोठे आव्हान आहे. त्यामुळे आमदार पाटील यांना विधानसभा व आदिनाथच्या निवडणुकीत मिळालेले यश हे या दोन निवडणुकातील यशात जमीन आस्मानाचे अंतर आहे. यापुर्वी मतदारांनी डोळे उघडे ठेवून मतदान केले होते, यावेळी मतदारांनी अक्षरश: डोळे झाकून पाटील गटाला मतदान केले आहे, हे मान्य करावे लागेल. जर एवढ्या कठीण स्थितीत मतदारांनी तुम्हाला साथ दिली असेल तर त्याचे मोल हे निश्चीतच अनमोल आहे. त्यामुळे आदिनाथची सत्ता ही सुळावरील पोळी आहे. सत्व पाहणारी सत्ता आहे. आदिनाथ सुरू करण्यासाठी असलेल्या सर्व अडचणीवर मात करत हा कारखाना फायद्यात आणण्याची जबाबदारी आमदार पाटील यांची आहे. त्यामुळे त्यासाठी त्यांना आत्तापासूनच कामाला लागावे लागेल. जनतेला फक्त आणि फक्त यश पाहिजे हे विसरून चालणार नाही.

यश मिळाले नाहीतर समाजाला कारणे चालत नाही, थेट परिणाम लागतात. जो चांगले परिणाम दाखवेल तोच यशस्वी ठरणार आहे. त्यामुळे आमदार पाटील यांना यापुढे पुर्ण शक्तीनिशी व पुर्ण वेळ देवून काम करावे लागेल. त्यांच्याकडे हुशारी आहे, नम्रता आहे, भाषणाची उत्तम कला आहे, ते जेवढे नम्र तेवढेच करारी आहेत. त्यामुळे ते या परिस्थितीवर मात करतील यात शंका नाही. पण त्यांना सर्वात प्रथम नाराज कामगारांना समजावून घ्यावे लागणार आहे. कामगारात ही गटतट असतात, कोणी कोणत्या गटाचे याचा विचार न करता, सर्वांना समान वागणूक दिली पाहिजे. अनेक कामगार पुर्वीच्या पदाधिकाऱ्याच्या बंगल्यावर कामाला असतात, यावरही त्यांना सतर्क रहावे लागेल. कारखाना कामागारातील काही लोक सलगीचा फायदा घेऊन काम न करता इकडे तिकडे फिरतात, त्याचा तोटा कारखान्याला होतो, त्याची वाईट चर्चा होते हे सुध्दा थांबले पाहिजे. थोडक्यात काय तर प्रशासन पारदर्शक झाले पाहिजे. कामचुकाराला माफी नाही हे धोरण राबवावे लागणार आहे. कारखान्याच्या केवळ साखर निर्मितीतून कारखाना फायद्यात कधीच येणार नाही. सहवीज निर्मिती प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालवला पाहिजे, आणखी उपपदार्थ निर्मितीवर भर दिला पाहिजे. कारखान्याची वाहने वापरावर बंदी घालून स्व:ताची वाहने वापरणे, भत्ता न घेणे, सभासदांसाठी विविध योजना राबवणे, नियमानुसार गाळप करणे, पेमेंट निदान इतरांच्या बरोबरीने वेळेवर केले पाहिजे, अशा एक ना अनेक बाबीचे आव्हान मोठे आहे. तरीही यशच छप्पर फाडके मिळाले आहे तर कामही छप्पर फाडके करावे लागेल.

आदिनाथच्या निवडणुकीत निवडणूक बिनविरोध व्हावी; यासाठी सर्वात प्रथम माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी आवाहन केले. त्यानंतरही निवडणूक जाहीर झाली. त्यानंतर या निवडणुकीतून बागल गटाने माघार घेऊन उमेदवार उभे करायचे नाही असे जाहीर केले. तसेच जगताप गटाने आपण उमेदवार उभे करणार नसल्याचेही जाहीर केले. असे असलेतरी निवडणुकीत प्रचाराचा रंग भरला आणि पहिल्या टप्प्यातच जगताप गटाने पाटील गटास पाठींबा जाहीर केला. तर शेवटच्या टप्प्यात बागल गटाने अप्रत्यक्ष पाठींबा जाहीर केला. त्यामुळे निवडणूकी पासून अलिप्त राहण्याचे जे धोरण होते ते धोरण स्पेशल फेल गेले. यावेळी संत तुकोबारायांच्या अभंगाची आठवण आल्याशिवाय राहत नाही.

एक ब्रह्मचारी गाढवा झोंबता ।
हानोनिया लाता पळाले ते ।।
गाढवही गेले ब्रह्मचार्य गेले ।
तोंड काळे झाले जगा माझी ।।

पान १ वरून पुढे...

## चेअरमन पदी आमदार पाटीलच

सुजित बागल – ११७, दशरथ कांबळे – ५ **जेऊर गट :** श्रीमान चौधरी – ८०६१ (विजयी), महादेव पोरे – ८१९५ (विजयी), दत्तात्रय गव्हाणे – ८६०७ (विजयी), चंद्रकांत सरडे – ६८४६, प्रशांत पाटील – ६८९७, प्रमोद बदे – ६८११. **सालसे गट :** रविकिरण फुके – ८२३२ (विजयी), दशरथ हजारे – ७९३३ (विजयी), आबासाहेब अंबारे – ८४३९ (विजयी), विलास जगदाळे – ६८०५, नागनाथ चिवटे – ७०३९, नवनाथ जगदाळे – ६८०५, आण्णासाहेब देवकर – ८५८, दत्तात्रय जगदाळे – ८८२, भारत सरडे – ८१३. **पोमलवाडी गट :** किरण कवडे – ८५७१ (विजयी), नवनाथ झोळ – ८३४३ (विजयी), संतोष पाटील – ८३२८ (विजयी), दशरथ पाटील – ६७०१, बबन जाधव – ६८३७, नितीनराजे भोसले – ६७०८, रामदास झोल – ११३७, भरत जगताप – ७६६, प्रकाश गिरंजे – ७६५. **केम गट :** दत्तात्रय देशमुख – ८६२५ (विजयी), विजयसिंह नवले – ८१०६ (विजयी), महेंद्र पाटील – ८३३७ (विजयी), संजयमामा शिंदे – ७०६०, सोमनाथ देशमुख – ६७२८, सोमनाथ रोकडे – ६७७९, सुधीर साळुंखे – ८२४, बापूराव तळेकर – ९९७. **रावगाव गट :** डॉ.अमोल घाडगे – ८७७५ (विजयी), देवानंद बागल – ८०९२ (विजयी), अॅड.राहुल सावंत – ८०३६ (विजयी), आशिष गायकवाड – ६०४८, अभिजीत जाधव–पाटील – ७०५३, विनय ननवरे – ६६५४, कल्याण पाटील – ९९७, हरिभाऊ झिंजाडे – ९११, सुभाष शिंदे – ७८४. **इतर मागासवर्गीय गट :** दादासाहेब पाटील – ९१२९ (विजयी), रोहिदास माळी – ७१४६, रविंद्र गोडगे – ९५०. **अनुसूचित जाती जमाती गट :** राजेंद्र कदम – ८८०६ (विजयी), बाळकृष्ण सोनवणे – ७२२६, दशरथ कांबळे – १०४९. **विमुक्त जाती जमाती विशेष मागासवर्ग गट :** आ.नारायण पाटील – ६८१९ (विजयी), अनिल केकान – २४६२, रायचंद खाडे – ८७१

## ऋषीकेश वीर यांची क्लास वन अधिकारी पदी निवड



करमाळा(सं.प्र.) : शेलगाव(क) येथील रहिवाशी असलेले ऋषीकेश नागनाथ वीर यांची युपीएससी परीक्षेत ५५६ वा रँक मिळवून क्लास वन अधिकारी पदी निवड झाली आहे. ऋषीकेश याची यापुर्वी भविष्य निर्वाह निधी प्राधिकरण (EPFO) अधिकारी, Intelligence Beauru (I.B) अधिकारी पदी निवड झाली होती. परंतु क्लास वन अधिकारी होण्याचे त्याचे स्वप्न होते. ते त्याने साकार केले आहे.

ऋषीकेश हा मुंबई बेस्ट मध्ये सेवेत असलेले नागनाथ वीर यांचे सुपुत्र तर डॉ.तुषार वीर यांचा पुतण्या आहे. या निवडीबद्दल शेलगाव (क) ग्रामस्थांनी ऋषीकेश याचे विशेष अभिनंदन केले आहे.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)


शिवसेना
(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या
शहरप्रमुख पदी पुनश्च
श्री.प्रविण कटारिया
यांची व
जिल्हा उपप्रमुख पदी
श्री.संजय शिंदे
यांची निवड झाल्याबद्दल...
हार्दिक अभिनंदन..!
शिवसेना युवासेना
करमाळा

# भारतीय जनता पार्टीच्या ता.अध्यक्ष पदी काकासाहेब सरडे



करमाळा(सं.प्र.) : भारतीय जनता पार्टीच्या करमाळा तालुका अध्यक्ष पदी करंजे गावचे माजी सरपंच काकासाहेब सरडे यांची निवड करण्यात आली आहे. शेलगाव येथील शिवम प्राइड हॉटेलमध्ये पार पडलेल्या बैठकीत निवडणूक प्रमुख संदेश काकडे यांचे हस्ते सरडे यांना निवडीचे पत्र देण्यात आले. यावेळी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे उपस्थित होते. याच बैठकीत करमाळा ग्रामीण मंडळासाठी सचिन पिसाळ यांची निवड करण्यात आली. निवडीनंतर बोलताना काकासाहेब सरडे म्हणाले, की मी गेली अनेक वर्षे भाजपच्या कार्यात सक्रिय आहे. माझ्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण, पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर, जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत आणि गणेश चिवटे यांनी दाखवलेला विश्वास मी सार्थ ठरवेन. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपाचा प्रभाव वाढवण्यासाठी व तालुका भाजपमय करण्यासाठी पूर्ण ताकदीने कार्य करणार.

# विलास गुरूलिंग शिराळ यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा



करमाळा(सं.प्र.): खडकी जि.प.शाळेचे मुख्याध्यापक व सोलापूर जिल्हा शिक्षक पतसंस्थेचे तज्ञ संचालक विलास गुरूलिंग शिराळ यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा २७ एप्रिलला सायंकाळी साडेपाच वाजता रावगाव रोड लगत धम्मसंगीत मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदर्श शिक्षक समितीचे माजी राज्याध्यक्ष अंकुश काळे हे राहणार असून यावेळी आमदार दिलीप सोपल (बार्शी), आमदार नारायण पाटील, माजी आमदार जयवंतराव जगताप यांचेसह शिक्षक संघ (पाटील गट)चे राज्य सल्लागार बाळासाहेब काळे, यशकल्याणीचे गणेश करे-पाटील, जिल्हा सोसायटीचे चेअरमन तानाजी गुंड, सेल्स टॅक्सचे डेप्युटी कमिशनर नागेश जाधव (मुंबई), तहसीलदार राहुल पाटील (अमरावती), शिक्षक संघाचे (थोरात गट) सहसचिव मच्छिंद्रनाथ मोरे, मकाईचे मा.चेअरमन दिनेश भांडवलकर, गटशिक्षणाधिकारी जयवंत नलवडे, शिक्षण विस्तार अधिकारी नितीन कदम, बालरोग तज्ञ डॉ.प्रशांत करंजकर, राष्ट्रवादीचे ता.अध्यक्ष संतोष वारे, पोलीस निरीक्षक सतीश नांदुरकर (पुणे), जातेगाव केंद्रप्रमुख रमाकांत गटकळ आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमास नागरीकांनी उपस्थित रहावे;असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**समर्थ बालरूग्णालय स्त्रीरोग व प्रसुतीगृह**

डॉ.वृषाली अभिजित हंकारे (M.B.B.S. D.G.O)

डॉ.उदयसिंह नामदेव गायकवाड (M.B.B.S. D.C.H)

**उपलब्ध सुविधा..** • गरोदर माता तपासणी व उपचार • सुसज्ज प्रसुतीगृह व ऑपरेशन थिएटर • नॉर्मल आणि अति जोखमीची बाळंतपणे • मासिक पाळीचे आजार निदान व उपचार • वंध्यत्व निवारण • सिझेरियन प्रसुती • गर्भशयाचे आजार निदान व उपचार • मेनोपॉज क्लिनिक

**महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत गरीब व गरजू रूग्णांसाठी ठराविक गंभीर आजारावर मोफत उपचार (MJPJAY)**

• नवजात अर्भक अतिदक्षता विभाग (NICU) • व्हेंटिलेंटरची सोय
• बालरोग अतिदक्षता विभाग (PICU) • CPAP • Pulsoximeter
• दररोज लसीकरण सुविधा (Vaccination) • वाफेची सोय (Nebulizer)
• बाल दमा निदान व उपचार • सेंट्रल ऑक्सिजनची सोय • 02 Concentrator

गायकवाड चौक, करमाळा. (०२१८२-२२००५७, ९१४६४३०५५०)

# ज्ञानेश्वर वाचनालय तर्फे जागतिक पुस्तक दिनानिमित्त ग्रंथदिन साजरा

करमाळा(सं.प्र.) : करमाळा नगरपरिषद संचलित श्री ज्ञानेश्वर वाचन मंदिर मुक्तद्वार वाचनालय येथे जागतिक ग्रंथ दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी ग्रंथालयशास्त्राचे जनक एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी धनंजय कवितकर, बापू खारगे, विक्रम कांबळे, संजय जगताप, भास्कर पवार, विश्वास पाटील, प्रदीप चौकटे, सरडे सर, शहाजी सरडे, सोमनाथ सरवदे, प्रविण गायकवाड इ. मान्यवरांसह वाचक वर्ग, सभासद, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी पुस्तकाने मला काय दिले..? या विषयावर सामाजिक कार्यकर्ते नवनाथ लोंढे व्याख्यान देताना म्हणाले, की कसदार वाचनामुळे वाचकाचे व्यक्तीमत्व विकसित होण्यासाठी लाख मोलाची मदत होते. पुस्तकांनी मला ज्ञान, मान सन्मान, पुरस्कार भरपूर मिळवून दिले. वाचनामुळे माझे जीवन सुखी व समृध्द झाले. मी जास्त वाचन केले नाही, पण जे मोजके वाचले त्याने माझ्या जीवनात कलाटणी मिळून मी उत्कृष्ट वक्ता झालो. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मी वक्ता म्हणून गेली २९ वर्षे कार्यरत आहे. याचे श्रेय वाचनाला जाते; असे सांगितले.

सुत्रसंचालन वरीष्ठ लिपिक स्वाती माने यांनी केले तर प्रास्ताविक धनंजय कवितकर यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रदीप चौकटे यांनी मानले.

डॉ.ओंकार विलास शिराळ (B.D.S.) यांचा

**अनुजा दातांचा दवाखाना**









वेळ : सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत (सोमवार ते शनिवार)

**उपलब्ध सुविधा...**









• स्टेट ऑफ द आर्ट डेंटल चेअर
• पोर्टेबल एक्स-रे
• वेडेवाकडे/पुढे आलेल्या दातांचे ट्रीटमेंट
• लहान मुलांच्या दातांचे ट्रीटमेंट
• दातांच्या रंगाचे/पांढरे सिमेंट भरणे
• वेदनारहीत इंजेक्शन प्रणाली
• दात काढणे
• शस्त्रक्रिया करून अक्कलदाढ काढणे
• इंट्राओरल स्कॅनरद्वारे दातांचे माप घेणे
• दातांच्या आधारे पक्के दात बसवणे
• डेंटल इम्पलांटच्या सहाय्याने दात बसवणे
• पूर्ण/आंशिक कवळी कमीत कमी अपॉइंटमेंटमध्ये बसवणे
• जबड्याच्या आजारांचे निदान
• रूट कॅनल ट्रीटमेंट
• अल्ट्रासोनिक मशीनद्वारे इन्फेक्टेड टिश्यू डिब्रायडमेंट करणे
• पुढील दातांमधील गॅप बंद करणे
• अल्ट्रासोनिक मशीनद्वारे दात स्वच्छ करणे
• दात पांढरे/शुभ्र करणे
• इंट्राओरल कॅमेराद्वारे तपासणी
• तंबाखू/गुटखा सवयी सोडवण्याबद्दल कौन्सलिंग
• मुख कर्करोग निदान

कृष्णाजीनगर, कमलादेवी रोड, LIC ऑफिस शेजारी, बायपास चौक, करमाळा.

# करमाळा तालुक्याच्या विकासासाठी सावंत गटाचे योगदान महत्वपूर्ण : आ.नारायण पाटील



करमाळा(सं.प्र.) : समाजकारणातून राजकारणात यशस्वी वाटचाल करणाऱ्या सावंत गटाचे करमाळा तालुक्याच्या विकासासाठी योगदान महत्वपूर्ण आहे; असे मत आमदार नारायण आबा पाटील यांनी व्यक्त केले.

माजी नगरसेवक संजय भगवान सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज तरूण मंडळाच्या वतीने भव्य नागरी सत्कार आयोजित केला होता. त्याप्रसंगी आ.पाटील बोलत होते. यावेळी ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष ॲड.डॉ.बाबुराव हिरडे, आदिनाथचे माजी संचालक डॉ.वसंतराव पुंडे, शिवसेना जिल्हा उपप्रमुख संजय शिंदे, माजी नगरसेवक अल्ताफ तांबोळी, प्रशांत ढाळे, अतुल फंड, शिवसेना शहरप्रमुख प्रविण कटारिया, आदिनाथचे नूतन संचालक डॉ.हरिदास केवारे, ॲड.राहुल सावंत, डॉ.अमोल घाडगे, देवानंद बागल यांचेसह ॲड.बलवंत राऊत, अरूण जगताप, संतोषकाका कुलकर्णी, फारूक जमादार आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना आ.पाटील म्हणाले, की तालुक्याच्या राजकारणात सावंत गटाने किंगमेकरची यशस्वी भुमिका बजावली आहे. यामध्ये आदिनाथ कारखाना, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, लोकसभा, विधानसभा निवडणुकीत सावंत गट ज्यांना पाठबळ देतो तो विजयी होतो; असे समीकरण झाले आहे. शहराबरोबरच तालुक्यामध्ये सावंत गट हाच खरा जनतेच्या मनातील जिव्हाळा असणारा एक प्रमुख घटक बनला आहे. त्यामुळे सावंत कुटूंबाला विविध राजकीय पदावर काम करण्याची संधी जनतेने दिली आहे. माजी नगरसेवक संजय सावंत यांचे काम जनतेसाठी आदर्श असून ते सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहुन काम करतात. त्यांचे भविष्य उज्वल असून त्यांच्या वाटचालीसाठी शुभेच्छा ! सावंत गल्ली येथील हनुमान मंदिराच्या सभा मंडपासाठी ३० लाख रूपये निधी निश्चित मंजूर करू; अशी ग्वाही देत सावंत कुटूंबाचे व पाटील कुटूंबाचे संबंध चार पिढ्यापासून असून कै.सुभाष आण्णा सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या राजकीय जीवनाची सुरूवात झाल्याचे आ.पाटील यांनी सांगितले.

> सावंत कुटूंबाच्या समाजसेवेचा वारसा जपण्याचे काम आपण काका विठ्ठल आप्पा सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहोत. सर्वसामान्य जनतेच्या पाठबळावर आपण काम करत असून आगामी काळात बेराजगार तरूणांच्या हाताला काम मिळवून देण्यासाठी लवकरच एक मोठा उद्योग उभा करणार असल्याचे माजी नगरसेवक संजय सावंत यांनी सांगितले.

यावेळी आदिनाथच्या निवडणुकीत एकहाती विजय मिळवल्याबद्दल सावंत गटाच्या वतीने आमदार नारायण पाटील यांचा शाल श्रीफळ देवून मानाचा फेटा बांधून सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक व सुत्रसंचालन खारगे गुरूजी यांनी केले. उपस्थितांचे आभार सावंत गटाचे नेते सुनील सावंत यांनी मानले. यावेळी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खुशखबर खुशखबर
मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको औरंगाबाद(२०८ किमी), नको मिरज (२३० किमी), आता आपल्या करमाळा (१/२ किमी) शहरात
डॉ.लोकरे हॉस्पिटल मध्ये सोमवार व गुरूवारी उपलब्ध
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
उपलब्ध सुविधा...
● मुळव्याधवर इंजेक्शन ● डिलीव्हरीनंतर उद्‌भवारे कोंब ● एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्‌भवणारे कोंब ● संडासवाटे रक्त येणे, पु येणे ● संडासची जागा बाहेर पडणे ● संडास जागी खाज व आग होणे ● संडासाचा नागवेडा ● संडास नंतर बसण्यास त्रास होणे ● भगंदर, फिशर ● चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई
ओपीडीचे वैशिष्ट्ये...
● इंजेक्शन सुविधा ● लेझर सुविधा
● प्रभावी औषधी सुविधा ● मुळव्याधी आवश्यक ड्रेसिंग
● मेडिक्लेम सुविधा उपलब्ध ● पार्किंगची व्यवस्था
● आठवड्यातून दोनदा ओपीडी
विशेष सुचना... १. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल. २. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे. ३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील. ४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य. ५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
नाव नोंदणीसाठी संपर्क मो.9763035862
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या करमाळा शहर प्रमुख पदी प्रविण कटारिया यांची निवड



करमाळा(सं.प्र.): शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या करमाळा शहर प्रमुख पदी प्रविण कटारिया यांची पुनश्च: निवड करण्यात आली आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने, शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या सामना या दैनिकातून शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या आदेशाने ही नियुक्ती करण्यात आली. सोलापूर जिल्हा संपर्क नेते अनिल कोकीळ, जिल्हाप्रमुख धनंजय डिकोळे, तालुका प्रमुख सुधाकर लावंड, उपजिल्हाप्रमुख संजय शिंदे यांच्या उपस्थितीत कटारिया यांच्या निवडीची घोषणा करण्यात आली. गेली २८ वर्षापासून प्रविण कटारिया हे शिवसेनेच्या शहरप्रमुख पदावर कार्यरत असून त्यांची ही निवड पाचव्यांदा झालेली आहे. करमाळा तालुका व शहराच्या शिवसेनेच्या जडणघडणीमध्ये प्रविण कटारिया यांचे असलेले योगदान पाहून पक्षाने पुन्हा एकदा त्यांना संधी दिलेली आहे. करमाळा शहरात शिवसेनेच्या माध्यमातून अनेक उपक्रम, सामाजिक कार्य, विविध उत्सव साजरा करण्याचे काम प्रविण कटारिया यांनी केलेले आहे. करमाळा शहरातील नामांकित जय महाराष्ट्र मित्र मंडळ व जय महाराष्ट्र नागरी सहकारी पतसंस्थेचे ते संस्थापक असून या दोन्ही संस्था अतिशय उत्कृष्टपणे कामकाज करीत आहेत. कटारिया यांचा जनसंपर्क दांडगा असल्यामुळे व कुशल संघटन कौशल्यामुळे त्यांना पुन्हा एकदा संधी प्राप्त झाल्याबद्दल जय महाराष्ट्र मित्र मंडळ, जय महाराष्ट्र नागरी सहकारी पतसंस्था, शिवसेनेचे सर्व पदाधिकारी व शिवसैनिक यांनी कटारिया यांचे अभिनंदन केले आहे.

यावेळी बोलताना कटारिया म्हणाले, की शिवसेनेचे काम प्रत्येक प्रभागात शाखा निर्माण करून व घर तिथे शिवसैनिक ही संकल्पना राबवून सर्वसामान्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

**सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू. भरून वर्षभर घरपोच अंक मिळवा..!**

महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामूक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्याप्रमाणे !
२ चाकी | ३ चाकी | ४ चाकी | ट्रक | ट्रॅक्टर | JCB | पोक्लेन | सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

स्थलांतर.. ३० वर्षापासून आपल्या अखंड सेवेत.. स्थलांतर..
शांतिसागर बँगल्स स्टोअर
हे दुकान..... स्टेट बँकेशेजारी, राशिनपेठ, करमाळा येथे चालू आहे.
बांगड्याचे होलसेल व्यापारी
आपल्या लाडक्या मुला-मुलींच्या लग्नासाठी लागणाऱ्या बांगड्या होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण !
संपर्क : मो.नं.9766075378
पत्ता : स्टेट बँकेशेजारी, राशिनपेठ, करमाळा







धर्मवीर वैद्यकिय मदत सामाजिक संस्था ठाणे संचलित

College Code : 1384

**श्रीमती गंगुबाई संभाजी शिंदे इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग (कॉलेज), करमाळा.**

ग्रामीण भागातील मुला-मुलींसाठी 'नर्सिंग' क्षेत्रात करिअरची सुवर्णसंधी !

**G.N.M.**
**डिप्लोमा कोर्स**

**प्रवेश देणे सुरू**

- **कालावधी :** ३ वर्षे
- **शैक्षणिक पात्रता...**
  १२ वी पास (सायन्स/कॉमर्स/आर्टस्)

**मान्यताप्राप्त..**

- महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
- महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक मंडळ, मुंबई
- महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई

- १००% नोकरीची हमी
- सर्व शासकीय शिष्यवृत्तींचा लाभ
- फक्त मुलींसाठी मोफत प्रवेश..
- जॉब प्लेसमेंट
- हॉस्टेल सुविधा
- हॉस्पीटल व्हिजीट्स व प्रशिक्षण
- इंग्लिश स्पीकींग क्लासेस



**सुविधा...**

- राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, शासकीय, निमशासकीय परदेशात, नगरपालिका, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालय, खाजगी रूग्णालय, जिल्हा परिषद रूग्णालयामध्ये १००% नोकरीची सुवर्णसंधी !
- मुलींकरीता सर्व सोयीनीयुक्त होस्टेल व मेसची सुविधा.
- प्रात्यक्षिक व क्षेत्रीय अनुभवासाठी सुपर मल्टी-स्पेशालिटी रूग्णालय, मनोरूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालये.
- सुसज्ज लॅब, इमारत, भव्य ग्रंथालय, सुसज्ज कॉम्प्युटर लॅब.
- अनुभवी प्राध्यापक वर्ग, नामांकित हॉस्पीटलशी संलग्न नोकरीची हमी.
- एस.सी./एस.टी. विद्यार्थ्यांना (शासकीय नियमानूसार) १००% शिष्यवृत्ती सुविधा उपलब्ध.

**पत्ता : अमरनाथ टॉवर, तिसरा मजला, श्रीदेवीचामाळ रोड, करमाळा. फोन : (०२१८२)२९९५४७, ९५४५६२०९९९**

**२४ तास** आपल्या सेवेत

**मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे चॅरिटेबल हॉस्पिटल, करमाळा.**

**डॉ.ओंकार अभिमन्यु उघडे-पाटील** M.B.B.S. (Gen.Physician)
यांचे तज्ञ मार्गदर्शन व तपासणी

**सुविधा :** ॲडमीट, ऑपरेशन व सर्व रोगनिदान
मेंदू-मणका व गुडघे/संधिवात, त्वचारोग, स्त्रीरोग तज्ञ

टीप : दर आठवड्याला तज्ञ डॉक्टरांची व्हीजीट सेवा

**तपासणी फी फक्त Rs.100/-**

**पत्ता : अमरनाथ टॉवर, दुसरा मजला, श्रीदेवीचामाळ रोड, करमाळा. मो.८४४६१३९५९३**

# कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये स्वच्छता अभियान



करमाळा(सं.प्र.): करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शंभर दिवसाच्या विकास आराखडा अंतर्गत मुख्यमंत्री कृषी उत्पन्न बाजार समिती स्वच्छ बाजार आवार अभियानांतर्गत स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ आमदार नारायण पाटील व बाजार समितीचे सभापती तथा माजी आमदार जयवंतराव जगताप यांचे हस्ते करण्यात आला. याप्रसंगी बाजार समितीचे संचालक नवनाथ झोळ, जनार्धन नलवडे, मनोज पितळे, नागनाथ लकडे, आदिनाथचे संचालक देवानंद बागल, ॲड.राहुल सावंत, डॉ.अमोल घाडगे, महेंद्र पाटील, दादासाहेब पाटील, डॉ.हरिदास केवारे, हनुमंत सरडे, राजाभाऊ कदम, महादेव पोरे, माजी नगराध्यक्ष प्रशांत ढाळे, खरेदी-विक्री संघाचे संचालक दादासाहेब लबडे, शहाजी शिंगटे, उद्योजक संतोष गुगळे, विक्रांत मंडलेचा, मयुर दोशी, उत्कर्ष गांधी, प्रितम लुकडे यांचेसह शेतकरी, व्यापारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार विठ्ठल क्षीरसागर यांनी मानले.

# करमाळा शहरात सकल जैन समाजाचा मुक मोर्चा




करमाळा(सं.प्र.): मुंबई येथील विलेपार्ले स्थित भगवान पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर हे बीएमसीने कोणतीही पूर्व सूचना न देता जमीनदोस्त केले तसेच मध्यप्रदेश येथे माथेफिरू तरुणांकडून जैन साधूंवर प्राणघातक हल्ला केला. या घटनेच्या निषेधार्थ करमाळा शहरातील सकल जैन समाजाच्या वतीने तहसील कचेरीवर मुकमोर्चा काढण्यात आला. यावेळी बीएमसी मुंबई येथील दोषी अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करून जे मंदिर पाडले आहे ते राज्य शासनाने त्यांच्या आर्थिक नियोजनातून पुन्हा बांधून द्यावे; याबाबत निवेदन देण्यात आले. यावेळी जम्मू-काश्मीर मधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या बांधवांना श्रध्दांजली वाहण्यात आली. तसेच दहशतवाद्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी करमाळा शहर सह तालुक्यातील जेऊर, केम, जिंती येथील सकल जैन समाजाचे महिला, पुरूष, लहान व मोठी मुले-मुली या मोर्चात मोठ्या संख्येने उपस्थित होते

# कोर्टी येथे २ मे पासून त्रिदिनी किर्तन महोत्सव

करमाळा(सं.प्र.) : मुर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन सोहळा आणि भजनसम्राट बाबुरावजी धामणीकर गुरूजी यांच्या १६ व्या पुण्यतिथीनिमित्त कोर्टी येथे २ मे पासून त्रिदिनी किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात सायंकाळी ५ ते ७ संतकथा निरोपण सोहळा कार्यक्रम होणार आहे. २ मे ला भागवताचार्य सागर महाराज बेलापूरकर यांचे तर ३ मे ला समाजप्रबोधनकार अक्रूर महाराज साखरे यांचे किर्तन होणार आहे. ४ मे ला सायंकाळी सहा ते आठ ह.भ.प. डॉ.न्यायमुर्ती मदन महाराज गोसावी यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. यावेळी सामाजिक व अध्यात्मिक पुरस्काराचे वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते केले जाणार आहे. तरी या कार्यक्रमाचा लाभ नागरीकांनी घ्यावा; असे आवाहन ह.भ.प.मच्छिंद्र आप्पा अभंग, ह.भ.प.विजय महाराज अभंग यांनी केले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन शिवकृपा बहुउद्देशीय श्री संत हरिहरि बाबा वारकरी शिक्षण संस्था कोर्टी यांचे वतीने करण्यात आले आहे.

• प्रोप्रा : सुनील भिमशंकर चिवटे
गुंडाप्पा फटाका स्टॉल
नामवंत कंपनीचे...
• तोफा, कलर तोफा
• ६० शॉट, १२० शॉट, २४० शॉट
• कागदी शॉट
• एक हजारी माळ, दोन हजारी माळ पाच हजारी माळ इ.
फटाके होलसेल दरात मिळतील

शॉपिंग सेंटर, गाळा नं.६, सागर थिएटरच्या समोर, गायकवाड चौक, करमाळा.
संपर्क : मो.9850746608 / 9763635707

## सावधानतेची जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस विशेषत: करमाळा शहर व तालुक्यातील लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि.सोलापूर सब डि व ता. करमाळा, जि.प.सोलापूर पैकी करमाळा ग्रामीण येथील शेतजमीन. क.ग.नं.३००/२/क पैकी पूर्वेची ०० हे. ६६ आर + पो.ख. ०० हे. ०७ आर, एकूण ०० हे. ७३ आर. सदर मिळकत आमचे अशिलांचे वडील मुरलीधर शिवराम जाधव यांच्या नावे आहे. तसेच सदर गट नं. पैकी ०० हे. १० आर क्षेत्र आमचे अशिलांचे भाऊ धनंजय मुरलीधर जाधव यांच्या नावे असून सदर गटामध्ये एकूण ०० हे. ८३ आर क्षेत्र आमचे अशिलांचे वडिलार्जित मालकीचे आहे.

वरील मिळकत ही आमचे अशिलांची वडिलार्जित एकत्र कुटूंबाची मिळकत असून, सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा एकत्रात अविभक्त हिस्सा, हक्क व अधिकार आहे. आमचे अशिलांचे वडिल वयोवृध्द झाल्याने तसेच आमचे अशिल हे परगावी राहत असल्याचा गैरफायदा घेवून भाऊ धनंजय जाधव यांनी सुनील हरिचंद्र लुणिया यांचेशी विसारपावती केलेली आहे. सदर विसारपावतीच्या अटी व शर्तीचा भंग झालेला असून सदर आमचे अशिलाची सदर मिळकत विक्री करण्याची इच्छा नाही. सदर विसारपावती प्रमाणे आमचे अशिलास कोणताही आर्थिक मोबदला मिळालेला नव्हता व नाही. सदर मिळकती मधील आमचे अशिलांचा असलेला कायदेशीर हिस्सा वाटप करून पृथकपणे कब्जात दिल्याशिवाय सदर मिळकतीचा कोणताही व्यवहार कोणाशीही करण्याचा अधिकार नाही. आमचे अशिलाच्या अपरोक्ष सदर मिळकतीचा खरेदी करण्याचा व्यवहार झाल्यास किंवा तसा कोणी खरेदी करण्याचा प्रयत्न केल्यास आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. आमचे अशिल सदर मिळकतीबाबत योग्य त्या दिवाणी न्यायालयामध्ये दावा दाखल करणार आहेत. तरी सदर मिळकतीबाबत कोणीही साठेखत, गहाणखत, खरेदीखत, बक्षीसपत्र, विसारपावती, कब्जेपावती अगर अन्य कोणतेही हस्तांतरणाचे व्यवहार करू नयेत. सदरचे व्यवहार केल्यास आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. ता.२५/४/२०२५

**अशिला तर्फे ॲडव्होकेट**
**ॲड.अलीम हामजेखान पठाण**
करमाळा, जि.सोलापूर

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषत: शहर करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर येथील व परिसरातील लोकांना व वित्तीय संस्था, बँक वगैरे यांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि.सोलापूर सब डि व ता.करमाळा पैकी शहर करमाळा येथील करमाळा म्युनिसिपल हद्दीतील गट नं.१९९ चे क्षेत्र ०० हे. ९९ आर + पो.ख. ०० हे. ०१ आर, आकार ०३ रू. ०० पैसे या मिळकती पैकी श्री.बळीराम विठोबा चिंचकर यांचे नावे विकसीत करणेत आलेले ९२०० चौ.मी. क्षेत्रफळातील निवासी उपयोगी भूखंड तथा सर्व प्लॉट्स येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत आतील संपूर्ण तदंगभूत वस्तुंसह सदरील विवादीत मिळकत आमचे अशिल श्री.विष्णु विठोबा चिंचकर रा.करमाळा आणि त्यांचे इतर भाऊ-बहिण यांची वारसाहक्काने मिळालेली समाईक मालकी हक्काची आहे. आमचे अशिलांचे भाऊ श्री.बळीराम विठोबा चिंचकर यांनी वरील मिळकतीचे सातबारा पत्रकी असलेल्या पोकळ नावनोंदीचे आधारे सदर मिळकतीमध्ये प्लॉटींग केले आहे. असे असलेतरी त्यापूर्वीच आमचे अशिलांनी उपरोक्त गट नं.१९९ या जमिनीचे वाटप होऊन मिळणेकरीता मे.करमाळा येथील सि.ज.ज्यु.डि.साहेब यांचे कोर्टात रे.मु.नं.१/२०२० हा दावा दाखल केला असून सदरचा दावा सध्या प्रलंबित आहे. तसेच सदर रे.मु.नं.१/२०२० या दाव्यात श्री.बळीराम चिंचकर यांनी दाव्याचा निकाल होईपावेतो उपरोक्त मिळकत विक्री करणार नसल्याचे लेखी अंडरटेकिंग दिले आहे. तरी उपरोक्त नमूद मिळकतीबाबत श्री.बळीराम विठोबा चिंचकर यांचेशी कोणीही, कसलाही हस्तांतरणाचा, खरेदी-विक्री, साठेखत, गहाण, दान, बक्षीसपत्र, कर्ज-बोजा, मॉरगेज अशा स्वरूपाचे व्यवहार करू नयेत. सदरची सावधानतेची जाहीर नोटीस प्रसिध्दीनंतर जाणुनबुजून अथवा मुद्दामहून कोणीही कोणत्याही स्वरूपाचे आर्थिक व्यवहार अथवा वरील मिळकतीचे हस्तांतरणाचा व्यवहार केलेस ते आमचे अशिलांवर बंधनकारक न राहता उपरोक्त रे.मु.नं.१/२०२० या दाव्यातील मे.कोर्टाचे न्यायनिर्णयास अधिन राहणार आहेत. याउपर वरील मिळकतीबाबत कोणीही काही एक व्यवहार केल्यास व तशा व्यवहारामुळे आमचे अशिलांची फसवणूक अथवा नुकसान झाल्यास संबंधित व्यवहार करणारी व्यक्ती जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवणूक होऊ नये या शुध्द व प्रामाणिक हेतूने ही जाहीर नोटीस दिली असे. ता.२५/४/२०२५

**अशिला तर्फे ॲडव्होकेट**
**ॲड.बी.आर.राऊत, महेंद्रनगर, करमाळा.**


मस्कर ॲग्रो सर्व्हिसेस
व
सर्व सेवा केंद्र
मस्कर ट्रेडिंग कंपनी

आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड
धानुका, तेजस्, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर, प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.
बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558

श्री गजानन अगरबत्ती
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य
योग्य दरात मिळेल !

पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)


BIS - 916
CELEBRATE
AKSHAY TRITIYA
WITH EXCLUSIVE
DESIGNS
विश्वसनीय दालन
सोनी
ज्वेलर्स
916 हॉलमार्क सोने-चांदी
व राशी खड्यांचे व्यापारी !
अक्षयतृतीया
निमित्त मजुरीवर
